सोबत तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीस अंतिम मान्यता देणेबाबतचे** परिपत्रक क्रमांक १०/पदविका प्रवेश २०२१-२२/अंतिम गुणवत्ता यादी/DSD/५२८ दिनांक २४/०६/२०२२ सोबत जोडलेली आहे.कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

क्र.विकाअ/शिक्षण/अंतिम गुणवत्ता यादी /२०२२/ 1663
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 30 JUN 2022

**प्रति,**

**प्राचार्य**, सर्व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांना पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था अमरावती विभाग, अमरावती यांना सदर पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याकरीता अग्रेषित.

**प्र.सहसंचालक,**
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत: प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:१०/पदविका प्रवेश २१-२२/ अंतिम गुणवत्ता यादी/DSD/ ५२८ दि. 24 JUN 2022

परिपत्रक

विषय: शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीस अंतिम मान्यता देणेबाबत

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचा अंतिम दि. २५/१०/२०२१ व प्रवेश डेटा अपलोड करण्याचा अंतिम दि. २६/१०/२०२१ असा निर्धारित करण्यात आलेला होता. त्यास अनुसरुन सर्व संबंधित संस्थांनी प्रवेश केलेले होते.

शासनाने घोषित केलेल्या नियमानुसार प्रवेश प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर, सर्व तांत्रिक पदविका शिक्षण संस्था यांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडे प्रवेश मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यास अनुसरुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीस मान्यता देणेबाबतची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षी संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सदर ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन विभागीय कार्यालय, तंत्रशिक्षण यांनी गुणवत्ता यादीची पडताळणी केलेली असुन ती अंतिम मान्यतेकरिता ऑनलाईन पद्धतीने संचालनालयास त्यांच्या शिफारशींसह सादर केलेली आहे. सदर पडताळणी करताना प्रवेश मान्यतेसाठीच्या कॅप व संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या व राखीव कोटा असलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी, उमेदवारीचा प्रकार, आरक्षण, अर्हता इत्यादी तसेच संस्था स्तरावर प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या प्रवेशासाठीची आवश्यक कागदपत्रे इ. ची पडताळणी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी केलेली आहे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी नमुद केलेल्या शिफारशींस अनुसरुन प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस अंतिम मान्यता देण्याच्या अनुषंगाने संस्थेच्या संबंधित प्रवेशप्रक्रियेच्या लॉगीनमध्ये संचालनालयाद्वारे प्रमाणपत्र (Certificate) उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचबरोबर संस्थेच्या लॉगीनमध्ये अभ्यासक्रमनिहाय अंतिम मान्यता देण्यात आलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे [Institute-wise Candidate List (Proforma B)] याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:

१. प्रणाली व्यवस्थापक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी